# राहूल अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

नों.क्र.:- बी.ओ.एम./डब्ल्यू.ई./आर.एस.आर./(सी.आर.)/४३९/१९८९-९०
मुख्य कार्यालय : श्री लक्ष्मी को-ऑप.हौ.सो., ऑफिस नं. २३, पहिला माळा, ना. म. जोशी मार्ग,
भायखळा (प.), मुंबई-२७. फोन : ९००४४९६१०१/९००४४९६१०८

शाखा विस्तार : ●भायखळा ● विलेपार्ले ● नवी मुंबई ● ठाणे ● कल्याण (पुणे विभाग) ● नारायणगांव ● जुन्नर ● मंचर ● ओतुर ● आळेफाटा

दिनांक : २९/१२/२०२१

प्रती
श्री. आदरणीय सभासद,

महोदय,

विषय : **''अक्रियाशील सभासद''** **''वर्गीकरणा''** बाबत

वरील विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, आपल्या **''राहुल अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. मुंबई''** या सहकारी संस्थेच्या संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणुक या वर्षी होत आहे.

९७ व्या घटना दुरुस्तीमुळे शासनाच्या आदेशानुसार आपल्या संस्थेने सुधारीत **''आदर्श उपविधी''** स्विकारलेले आहेत. ९७ व्या घटना दुरुस्ती २०१४ नंतर **''क्रियाशील सभासद''** बाबतचे पात्रता निकष आपणास या पुर्वी दरवर्षी अहवालाद्वारे कळविण्यात आलेले आहेत.

त्यानुसार आपला **''संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील किमान उपस्थिती''** आणि **''संस्थेच्या व्यवसायातील किमान आर्थिक सहभाग''** ह्या निकषांवर **''अक्रियाशील सभासद''** या वर्गवारीत अंतर्भाव होत आहे. त्यामुळे आपणास संस्थेच्या संचालकांच्या निवडणुक प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही याची नोंद घ्यावी हि विनंती. या सदंर्भात आपली काही **''हरकत''** असल्यास किंवा **''म्हणणे''** असल्यास पत्र मिळाल्यापासून १५ दिवसांच्या अगोदर लेखी स्वरुपात कळवावे हि विनंती. त्यानंतर आपली कोणतीही हरकत नाही असे गृहीत धरले जाईल व आपले नाव **''अक्रियाशील सभासद''** म्हणून वर्गीकृत यादीत समाविष्ट करण्यात येईल व अंतिम मतदार यादी तयार करण्यात येईल, कळावे.

## सभासदांचा आर्थिक सहभाग स्पष्टीकरण

अ) क्रियाशील सभासदाचा व्यवसायिक थेट सहभाग म्हणजे मागील सलग पाच वर्षांपैकी किमान एक वर्षांसाठी ₹ पाच हजार किंवा त्यापेक्षा जास्त रकमेचे कर्ज घेतलेले असले पाहिजे. सदर कर्जव्यवहार संपूर्ण कालवधीमध्ये केव्हाही अनुत्पादक कर्जामध्ये सामाविष्ठ नसले पाहिजे.

किंवा

ब) क्रियाशील सभासदाचा व्यावसायिक थेट सहभाग म्हणजे मागील सलग पाच वर्षांपैकी किमान एक वर्षासाठी ठेवी संदर्भात किमान व्यवहार हा पतसंस्थेचे खेळते भांडवलाच्या प्रमाणात (ज्या पतसंस्थेचे खेळते भांडवल रु.२५ कोटी किंवा त्या पेक्षा जास्त असेल तर) किमान रु. १० हजार असला पाहिजे.

किंवा

क) ठेवी व कर्जे या व्यतिरिक्त पतसंस्था पुरवित असलेल्या अन्य पुरक सेवा त्याने मागील सलग ५ वर्षांपैकी किमान १ वर्षांसाठी रु. १,०००/- किंवा त्यापेक्षा जास्त रक्कमेची संस्थेकडून घेतली असली पाहिजे.

वरील तीन पैकी किमान एक पात्रता निकष आवश्यक आहे.

आपला

Chaudhari

मुख्य कार्यकारी अधिकारी
राहूल अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.